प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेनुसार आपण संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केलेला आहे. संसदीय शासन पध्दतीमध्ये सत्तचे विभाजन (Decentralization of Power) हे महत्वाचे मुळ तत्व मानले जाते. लोकांच्या शासनातील व एकूणच राजकारणातील सहभागत मोजण्याच्या दृष्टीने व तो सक्रिय होण्याच्या दृष्टीने सत्तेच्या विभक्तीकरणाला महत्व आहे. महात्मा गांधीजींनीही देखील आपल्या राजकीय व्यवस्थेमध्ये ग्राम म्हणजे ' खेडे ' प्रधान मानून यातील लोकांच्या राजकीय सहभागाला महत्वाचे स्थान दिले होते. हेच सुत्र पकडून वसंतराव नाईक यांच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रात १ मे १९६२ रोजी पंचायत राज व्यवस्था स्विकारण्यात आली. व त्या अनुरोधाने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय व्यवस्था मान्य करण्यात आली.

पंचायत राज व्यवस्था स्विकारल्यानंतर लोकांच्या राजकीय सहभागाच्या अनुरोधाने स्त्री आणि पुरूष दोघांनाही सत्तेत समान सहभागी होता यावे ही अपेक्षा मान्य करण्यात आली. महिलांना मिळालेले ३३% व आता ५०% आरक्षण याचाच परिणाम होय. अनादी काळापासून स्त्री - पुरूष समानतेच्या व समान हक्काविषयी आपण अनेक बाबी ऐकत आलेलो आहे. व वाचीत आहोत. आरक्षणामुळे महिलांना बऱ्याच प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रतिनिधीत्व मिळाले. परंतु प्रत्यक्षात मात्र या प्रतिनिधीत्वाचा स्वतःच्या कार्यक्षमतेच्या आधारावर त्यांना उपयोग करून घेता आला का? हा प्रश्न निरूत्तरच राहिला आणि म्हणून हेच सुत्र पकडून अभ्यासकाने "नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचयती मधील महिलांच्या राजकीय सहभागचे विश्लेषणात्मक अध्ययन " विशेष संदर्भ (२००५ ते २०१५) या विषयाची निवड केलेली आहे.

प्रस्तूत विषय राज्यशास्त्र अभ्यासाच्या दृष्टीने प्रधान महत्वाचा मानला जातो. कारण लोकांच्या जास्तीत जास्त राजकीय सहभागावरच लोकशाहीचे यशापयश अवलंबून असते. या दृष्टीने पाहता महिलांचा राजकीय सहभाग (Political Participation) कशा पध्दतीने झालेला आहे. हे अभ्यासणे महत्वाचे ठरते.

बऱ्याचदा आरक्षणामुळे महिला विशिष्ट पदावर येतात. परंतु त्यांनी करावयाच्या कार्यालया बोलविता धनी मात्र दुसराच असतो. ही परिस्थिती बदलने आवश्यक आहे. महिलांचे स्वयंभू नेतृत्व निर्माण व्हावयास पाहिजे. या दृष्टीनेच प्रस्तूत अभ्यास करण्याचा प्रयत्न आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे आरक्षणामुळे मिळालेले पद व आरक्षणाचा कालावधी संपल्यानंतर हे महिला नेतृत्व लुप्त झालेले दिसून येते. यादृष्टीने प्रस्तूत विषयाची निवड करून गोषवारा नेणे हे अभ्यासकाचे उद्दिष्ट आहे. महिलांच्या राजकीय सहभागामुळे एकूणच ग्रामीण स्तरावरील पंचायत राज व्यवस्थेमध्ये काही परिवर्तन झालेले आहे का? काम करण्याची पध्दत कामाची तऱ्हा, लोकोपयोगी कार्य, संघटनात्मक बांधणी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यामधील सलोखा या मध्ये काही बदल झालेला आहे का? याचा आढावा घेणे प्रस्तूत अभ्यासाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

विषय निवड / महत्व :-

भारतात प्रत्येक राज्यात पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. विशेषत: ग्रामीण स्तरावर महिलांच्या राजकीय सहभागामुळे विकासाचे उद्दिष्ट कितपत साध्य झाले आहे. याचे वेळोवेळी मुल्यमापन होण्यासाठी प्रस्तूत अध्ययनाची आवश्यकता आहे.

प्रस्तूत विषयावर आजपर्यंत विशेष असे लेखन तथा संशोधन झालेले नाही. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीतील महिलांच्या राजकीय सहभागा विषयी विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके व संशोधन पत्रिकेतून काहीसे लेखन झाले असते तरी ते त्रोटक असून या विषयाचा सविस्तर अभ्यास व विश्लेषण प्रस्तूत संशोधन कार्यातून केले जाईल.

प्रस्तूत संशोधन हे रापज्यशास्त्राचे विद्यार्थी, अभ्यासक पत्रकार, जागृत मतदार यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व उपयुक्त असणार आहे. या अभ्यासातून राज्यशास्त्र, लोकप्रशासन व समाजशास्त्र उपयूक्त माहितीचे दालन खुले होईल.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तूत संशोधनासाठी "नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायती मधील महिलांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन " (२००५ ते २०१५) या विषयाचा अभ्यास केला जाणार आहे. पुरूषांप्रमाणे महिला देखील समाजाचे महत्वाचे अभिन्न अंग

असून त्यांनाही आपल्या राजकीय इच्छा-आकांक्षाच्या प्रकटीकरणासाठी राजकीय सहभाग महत्वपूर्ण असून नियोजित संशोधनात त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जाईल महिलांच्या राजकीय सहभागावर प्रभाव टाकणारे घटक, महिलांच्या राजकीय सहभागाची योग्य-अयोग्यता महिलांचा राजकीय वृध्दींगत करण्यासाठी शासकीय व अशासकीय स्तरावर होत असलेल्या उपाय योजना यांचाही अभ्यास नियोजित संशोधनातून केला जाईल.

संशोधनाच्या मर्यादा :-

i) संशोधन केवळ नाशिक जिल्हातील महिलांच्या राजकीय सहभागापुरतेच मर्यादित आहे.

ii) संशोधनाच्या कालखंड २००५ ते २०१५ असा निश्चित केल्यामुळे या दरम्यान महिलांच्या राजकीय सहभागाचाच अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात येणार आहे ही दुसरी मर्यादा आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

i) महिलांच्या स्थानिक पातळीवरील राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

ii) महिलांच्या राजकीय सहभागाला वृध्दीगंत करणारे घटक समजावून घेणे.

iii) महिलांच्या राजकीय सहभागाला प्रभावित करणाऱ्या घटकांची माहिती मिळवणे.

iv) महिलांच्या राजकीय सहभागाचा धोरण निर्मिती व अंमलबजावणीतील योगदानाचा अभ्यास करणे.

v) महिलांच्या राजकीय सहभागाशी संबंधित राजकीय आरक्षणाचे धोरण तपासणे.

vi) महिला नेतृत्व लुप्त होण्याची कारणे शोधणे.

गृहितके :-

गृहितके नेहमी उदयाचा वेध घेत असते आणि परीक्षणाला सामोरे जात असते. ते कधी सामान्य ज्ञानाच्या विरोधी असु शकते, कधी बरोबर असेल तर कधी चूकही असेल पण ते नेहमी भौतिक तथ्याचा पडताळा पाहण्यासाठी वापरले जाते म्हणून प्रस्तूत संशोधनात पुढील गृहितके तपासली जातील.

१) पुरूषाच्या मानाने स्त्री नेतृत्व जास्त कार्यप्रवण असते.

२) पुरूषांच्या बरोबरीने महिलांचा राजकीय सहभाग असावा या विषयी समाज मन अजूनही जागृत नाही.

३) महिलांच्या राजकीय सहभागामुळे पंचायत राज व्यवस्थेतील प्रशासनाचा दर्जा सुधारला.

४) महिलांच्या निरक्षरतेचा राजकीय सहभागावार परिणाम होतो.

५) महिलांच्या राजकीय आरक्षाणामुळे राजकीय सहभाग वृध्दिंगत झाला आहे.

६) महिलांच्या राजकीय सहभाग केवळ नामधारी ठरतो.

७) महिलांच्या राजकीय सहभाग वाढविण्यात शासकीय धोरणे त्रोटक ठरतात.

संशोधन पध्दती :-

प्रस्तूत संशोधनात निरीक्षणात्मक पध्दतीचा (Observation Method) प्रामुख्याने वापर करण्यात येऊन महिलांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येईल. आवश्यक त्या ठिकाणी संख्यात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल. यासाठी मिळविलेल्या आकडेवारीच्या आधारे स्तंभ-लेख काढले जातील.

तथ्य संकलन :-

प्रस्तूत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येईल.

अ) प्राथमिक स्त्रोत :-

मुलाखती, निरीक्षण, अनुसूची, शासकीय आकडेवारी.

ब) द्वितीय स्त्रोत :-

संदर्भग्रंथ, प्रकाशित पुस्तके, शोध पत्रिका, नियतकालिके, वर्तमानपत्र, गॅझेटिअर, इंटरनेट, वेबसाईट.

प्रकरण आखणी :-

प्रकरण १ : प्रस्तावना

नाशिक जिल्हा ओळख, तालुका ओळख, भौगोलिक रचना व जिल्हा वैशिष्ट्ये इ.

प्रकरण २ : पंचायत राज व्यवस्था

अर्थ, व्याख्या, राजकीय सहभागावर प्रभाव पाडणारे घटक, राजकीय, सहभाग वाढण्याची कारणमिमांसा, नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत मधील महिलांची सद्यस्थिती

प्रकरण ३ : राजकीय सहभाग

अर्थ, व्याख्या, राजकीय सहभागावर प्रभाव पाडणारे घटक, राजकीय, सहभाग वाढण्याची कारणमिमांसा, नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीची सद्यस्थिती

प्रकरण ४ : प्रश्नावली / मुलाखत माध्यमातून जमविलेल्या तथ्याची विषयानुसार मांडणी

प्रकरण ५ : विविध माध्यमातून एकत्रित केलेल्या तथ्याची विश्लेषणात्मक मांडणी.

प्रकरण ६ : विश्लेषणाच्या आधारावर निष्कर्ष व पुढील संशोधनाची सुचना.

गोषवारा / सारांश (Abstract of Research) :-

जिल्हा परिषद ग्रामीण स्तरावर कार्य करणारी महत्वाची संस्था आहे. या संस्थेत महिलांच्या राजकीय सहभागाला महत्व आहे. महिलांच्या राजकीय सहभागामुळे विकासाचे उद्दिष्टे कितपत साध्य झाले ते तपासुन पाहणे संशोधनाचा उद्देश आहे. प्रस्तूत संशोधनात निरिक्षणात्मक पध्दतीचा वापर करून विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे. त्याची व्याप्ती आणि मर्यादा नाशिक जिल्हा पुरतीच मर्यादित असणार आहे. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत एकूण १५ तालुके, १९३८ गांव व १३७३ ग्रामपंचायती येतात. १३७३ पैकी काही निवडक ग्रामपंचायतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. विविध महिलांकडुन प्रश्नावलीच्या सहाय्याने उत्तरे जाणून घेतली जातील. त्यासाठी नमुना निवड केली जाईल. ही नमुना निवड शास्त्रशुध्द व वस्तूनिष्ठ पध्दतीने केली जाईल. प्रस्तुत अभ्यासासाठी एकूण सहा प्रकरणे

मांडण्यात आली आहे व शेवटी पुढील संशोधनाची सुचना आहे ते समजण्याचा प्रयत्न राहील. प्रकरणांमध्ये जिल्हा ओळख, पंचायत राजची व्यवस्था व वैशिष्ट्ये, राजकीय सहभाग, अर्थ व्याख्या, महत्व / प्रश्नावलीच्या सहाय्याने माहितीचे विश्लेषणात्मक अध्ययन व त्या आधारावर निष्कर्ष काढण्याचा अभ्यासकाचा प्रयत्न राहील.

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography)

१) डॉ. बेहरे सुमन - 'सामाजिक संशाधन पध्दती', (तंत्रे आणि पध्दती), प्रथमावृत्ती २००४, विद्या प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. भोळे भा.ल.- 'जाती आणि राजकारण ', बाबासाहेब आंबेडकर ॲकेडमी सातारा, प्रथमावृत्ती २७ डिसेंबर १९९७.

३) डॉ. जैन पुखराज व - डॉ. फाडिया बी.एल. 'भारतीय शासन एवं राजनिति ', (राज्यो की राजनीति सहित) साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, प्रथमावृत्ती २००४.

४) डॉ. कऱ्हाडे बी.एल. 'शास्त्रीय संशोधन पध्दती ', पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, प्रथमावृत्ती २००७.

५) नांदेडकर पी.जी.- 'लोकल गर्व्हरमेंट' कॉन्सेप्ट पब्लिशिंग कंपनी, न्यु दिल्ली, प्रथमावृत्ती १९८६.

६) डॉ.पाटील पी.बी. - 'पंचायत राज जिल्हा नियोजन व ग्रांमीण विकास परिसंवाद' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती १९८९.

७) डॉ. पाटील पी.बी. - 'लोकप्रशासन' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८) 'पंचायत राज मूल्यमापन - शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई समिती अहवाल'

९) श्रीशरण - 'पंचायती राज और लोकसत्ता', पांडूलिपी प्रकाशन न्यु दिल्ली, प्रथमावृत्ती १९९०.

१०) श्रीवास्तव सुधारणी व श्रीवास्तव आशा ' महिला शोषण व मानवाधिकार ', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, न्यू दिल्ली.

११) झा.एस.एन. व - ' दि सेन्ट्रलाइझेशन ॲण्ड लोकल पॉलीटिक्स '
माथुर पी.सी. सागे पब्लिकेशन, न्यू दिल्ली, प्रथमावृत्ती १९९९.

संशोधक

श्री मगर मनोज श्रीकृष्ण
एम.ए.,बी.एड.,एम.फिल (राज्यशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस.एम. कदम
(राज्यशास्त्र विभागप्रमुख)
डी.एस.एम.संस्थेचे, कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
जिंतुर